स. ग्रं. सं. ठाणें
काव्य
६३५०

# महाराष्ट्र शाहीर मंडळ

## आधुनिक व ऐतिहासिक शाहिरी पोवाडे

६३५०

## भाग १ ( पहिला )

संपादक व प्रकाशक—
**लक्ष्मण एम्. परुळेकर**

मुद्रक—केशव तातोबा शेट्ये,
तत्त्वविवेचक प्रेस, मुंबई नं. ८.

REFBK-0005638
REFBK-0005638

त १॥ आणा

REFBK-0005638
REFBK-0005638



काव्य
नों. नं ५५५०

## नमन

( गं. वि. गोखलेकृत )

गणपती गौरिनंदना । तूं सकलकलांचा निधि
द्यावि मति कवना ॥

मज नाहिं काव्यकल्पना । दे स्फूर्ति शब्दभांडार
उघडि करी करुणा ॥

व्याकर्ण, वृत्तदर्पणा । स्वरछंद यमक पढवावे
मला अज्ञाना ॥

डफ दिमडी, झांज झणझणा । झणत्कार होतसे जणु
कां शारदेचा विणा ॥

मी अधीर जाहलो कीं गाना । ठेवुनी सिद्ध साहित्य
करीत प्रार्थना ॥

अभिमान नाहिं मीपणा । तूं गाता गावविता
गायक विद्यारमणा ॥

गंधर्व यक्ष अस्माना । पातले सभाजन गर्दि
जाहली स्थाना ॥

हे बोल स्फूर्तिचे जाणा । ध्या गोड मानुनी
हीच विनंती चरणा ॥ धृ० ॥

५६३८

—०—

## —प्रास्ताविक दोन शब्द—

---

महाराष्ट्र शाहीर मंडळाचें हें बारावें पुष्प रसिकवरांच्या स्वाधीन करण्यांत आम्हांस अत्यंत आनंद वाटतो. या छोटेखानी पुस्तकांत शक्य तोंपर्यंत विविधता आणण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. व त्याप्रमाणें कवि बालानंद ( नाशिक ), कं. ल. टेंभुर्णीकर ( संगमनेर ), य. खं. कुळकर्णी ( महू ), गं. वि. गोखले ( पुणें ) यांनीं आपलीं कवनें प्रसिद्ध करण्यास मोकळेपणानें परवानगी दिल्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत. या पुस्तकांत "नारायणरावाचा खून" व "खर्ड्यांची लढाई" हे दोन जुने पोवाडे थोडासा फेरबदल करून छापले आहेत. तसेंच "चितुरगडचा वेढा" या प्रसंगावरील पोवाडा लिहितांना आम्हांस श्री. राऊत ( स. सं. नवाकाळ ) यांच्या लेखांचा फार उपयोग झाला याचा उल्लेख करण्यास आम्हांस धन्यता वाटते. याशिवाय सवडींत सवड काढून पुस्तक छापून दिल्याबद्दल तत्त्वविवेचक छापखान्याच्या व्यवस्थापकांचेही आम्ही आभारी आहोंत.

गोपाळ भुवन
भवानीशंकर रोड
दादर–मुंबई

**अनंत विष्णु मुळे**
कार्यवाह, महाराष्ट्र शाहीर मंडळ

---

या पुस्तकांतील कवनांचे सर्व हक्क स्वाधीन आहेत.

# चितोडगडचा जोहार

## शाहीर "अनंतराय"

रणांगणीं अर्पिती शीर देति प्राणास । धर्मासाठीं लढुनियां मरति मोक्षपद त्यास । स्वातंत्र्यवीर धन्य ते आर्यभूमीस । मातृभक्त रजपुत शूर, रणझुंजार, करीती जेर, दिल्लिपतीस ॥ धृ० ॥

१

राजकारणपटु ते जिवावरति उदार । धर्मावरी संकट येतां करिति जोहार । बत्तीस दाति बोकडा नाहिं जाति हार । मरु मारु त्यांचा हा बाणा, मोठा मानिपणा, जयश्री त्यांना, घालिते हार ॥ ती पवित्र पावन भूमी चितुरगड । धर्माचं क्षेत्र याहुनी नाहिं वरकड । इथं शूर वीरांनीं रक्ताचं घातलं सड । यापुढं काय पंढरी, तशी काशिपुरी, याची नाहिं सरी, धन्य तो गड ॥ इथं रक्त सांडल किती रजपुत वीरांनीं । जोहार करुनि समशेर उपशिली त्यांनीं । पतिव्रता स्त्रिया त्या सौंदर्याच्या खाणी । मोंगल सर्व दीपल, पाप इच्छिल, यश ना आल, तेज पाहूनी ॥ चाल–चवताळति मोंगल सैतान, दात ओंठ खाऊन, येति बिनघोर–रजपुतावर ॥ शस्त्रांचा त्यांचा लई–जोर, रजपुत वीरं, महाखंबीर, करिति विचार–अपेश येणार ॥ धडधडा कुंड पेटविती, स्त्रिया उड्या घेति, करिति जोहार–अपेश ॥ पातिव्रत्य तेज तें दिव्य, करिति हें दिव्य, नख ना दिसणार–तुर्का साचार ॥ चाल–यवनांच्या झुंडिच्या झुंडी येति पूढती । रजपूत समशेरीच पाणी पाजिती । धारातीर्थी प्राण अर्पून मुक्ति पावती । नाहीं परकियांची नौकरी चाकरी करिती । म्लेंच्छाच्या पैशानं नाहिं कधीं भूलती । दादानो नाहिं लोकांत आगि लावती । काय चैन शब्द तो नाहिं पुरा माहिती ॥ ऽ चितूरगडाची तटबंदी बळकट । कित्येक, कलांडल

वीर नाहिं मिळे फट । अकबर येई चाल करुन करी लुटालुट । परि नाहिं डाळ शीजली, स्वारि परतली, फजीती झाली, किल्ला बीकट ॥ धृ० ॥

२

सुवर्णासाठीं मानव करि धडपड । आहे समाधान थोडक्यांत कोण सापड । बेटा शिकंदर पैशासी पाहूनी रड । ज्यान केल जग पादाक्रांत, एका झट-क्यांत, काय परि अंत, येई त्या रड ॥ राक्षसी महत्वाकांक्षेचा जगीं फेरा । तिन्ही लोक पादाक्रांत केल ओढी फरफरा । मानव बापुडा होई कावरा बावरा । अकबर झाला जगीं थोर, जरी उदार, केला त्यानं वार, रजपुता-वर कहर झाला ॥ लष्कर चालतां उठला धूळीचा लोट । चंद्र सूर्य गगनिं दिपवील मोंगल राठ । आली सेना रजपूतवीरांचा कराया येळकोट । उदे-सिंग पाहुनि त्या भ्याला, धर्मा विसरला, पळूनी गेला, धरीना नेट ॥ ख्यालि खुशालि माजी चैन नित्य करिती । अहर्निश विलासामधीं काळ घालवीती । स्वाभिमान देशाभिमान यांची विस्मृती । भागुबाई बांगडी भरी पारतंत्र्य उरी, मारिल सुरी, वृथा दुर्मती। (चा.) नामर्द राणा पळाला, हाहाकार झाला, धीर खचला—आधार गेला ॥ देशावरी संकट पडल, म्हणून गोळा झाल, गर्जु लागल, मोंगल आला—धीर खचला ॥ जयमल्ल वीर सरसावला, चित्ता चौता-ळला, लालेलाल झाला, निर्धार केला—मारिन शत्रूला ॥ झालि पराकाष्ठा राजाची, मोंगल सैन्याची, करीती ची ची, फुकट गेला हल्ला—काय करि अल्ला ॥ सुरुंग चारि बाजूनीं, बत्ति लावुनी, उडविला त्यांनीं, कहर केला—काय करि— ॥ फूल पाखरू नाहिं रजपूत, सहज हातांत, नाहिं गवसत, मेटा-कुटि आला, राजा फसला—काय करि ॥ चाल—कुणि म्हणोत अकबर राजा दयाळू फार । त्यापुढें कर्ण पडेल फिका साचार । करा स्तुती पर इथ नाहीं, विसर पडणार । विष कालवून, मिठाई म्हणून, अमिष दावून, रजपूतां करि ठार ॥ एके दिवशीं जयमल आला बुरूजावर । रात्रिचा समय झाला पडे अंधार ।

नेमकी गोळि सोडितो दयाळू अकबर। छातिन्त रक्ताचा लोट आला भूवर। नाहिं शुद्ध राहिली देहाची लोपला वीर ॥ ऽधर्मयुद्ध नव्हे हे कपटनीति या म्हणती। अकबरा करणि बरि नव्हे पाशवी कृती। लौकिका आला कलंक, झाली दुष्कीर्ती। तूं चेला साधुसंताचा, अवतार धर्मांचा, कृपाळू कैचा, वाटे मज खंती ॥ धृ० ॥

३

एक गेला आधार दुसरा स्वर्गी नेला। परमेशा ! काय तव मनीं कळेना आम्हाला। रजपूत जात भारतभूत नावाला। वाटतसे नाहिं ठेवणार, नाश करणार, मोंगल येणार, त्याच जागेला ॥ देवा ! हिंदु धर्मांचा वाली तुजला म्हणती। देवा ! पंचप्राणाच धागे सरसरा तुटती। कशी महंमद भक्तावर झुकली प्रीती। गोब्राह्मण छळण करणारे, मूर्ति फोडणारे, देवळ भंगणारे, बरवे वाटती ॥ झालों गलितधैर्य आम्ही कोण पुढें येणार। नाहीं तर शेंडी जावून सुंता होणार। जिथ देवळ तिथं मशीदी, नेत्रिं दिसणार। काय हिंदुनीं खावे गोमांस, फेकाव गतिस, वाचाव कुराणास, मृत्यु अम्हा प्यार ॥ इकड काय घडला वृत्तांत राजपुरुषांत। सरसावला तरुण रजपूत वीर तो पुत्त। समशेर उपसून म्हणे मोंगल झाले मदमत्त। लांडगेतोड भयंकर करिन, शत्रु पळवीन, पाहिन हर्षांत ॥ चाल–ओंठ पिळतां दूध पडल, बाल सुकुमार सोळा वर्षांच। शौर्य, सिंहाच ॥ गोरिगोमटि मूर्ति तय्यार, हृदय थरथर, रजपूत लोकांच शौर्य–॥ वीर पुत्त महालांत गेला, पोषाख करायाला बालपत्नी तिथं–हाच एकांत ॥ चितूरगडाची पुण्याई, पतीपत्नि ही, पुष्पें स्वर्गीय–उमलणार काय ॥ देवाच्या नाहीं मनांत, नाहिं पहावत, नाहीं घेववत, पुष्पसुगंध, कैचा आनंद ॥ चाल–पतिपत्नींची अंतिची भेट जाहली। दृष्टादृष्ट होतां हृदये कंपित झाली। स्वातंत्र्यासाठीं जीवाची तमा नाहिं केली। ''पतिराज माघार घ्या आज'' विनंती ना केली। नाहिं गळ्याला मिठी मारली।

नाहिं नेत्रांतुन गंगायमुनाची धार वाहिली । पुत्तानं राष्ट्रमातेच्या हाकेस ओ दिली । नाहींतर पहाव तरुण आज ह्या कालीं । लाडकी पत्नि जीवाची जिवलगी प्यारी । हिच्या हाकेंत मोठि माधुरी । प्रेमाची जगती थोरी । म्हणति देशकार्य यापुढं निव्वळ भोंदुगिरी । पत्निच्या हाकेची थोरी, मानुनी पुरुष बसविती बायका डोइवरी । पत्निचं समाधान करण्यांत आमची बहादुरी, देशकार्य येतां पूढच पाउल माघारीं ॥ ऽ प्रेम वल्ली दिव्य होति सर्वा विदित । संग्रामकालिं तिला नाहीं थारा कुणि देत । हिंदुस्तानी पारतंत्र्यांत तोरा मिरवित । आम्हि बाइलबुद्धी झालों, देशा विसरलो, वृथा रंगलो, प्रेमराज्यांत ॥ धृ० ॥

४

बालपत्नि विचारी, " नाथ ! धन्य तुम्ही व्हाल । त्या पवित्र समरांगणीं मोक्ष पावाल । स्वातंत्र्यसंगरीं लढुन देवलोकीं जाल । हतभागी काय मी करू, वृथा का मरू, नाहिं मी भिरू, सत्य हा बोल ॥ " " प्यारि ! ब्रीद राखणें बाणा रजपूतांचा । जर मेलो, गेलो, वाचलों तर भेटेन ही वाचा । नको मोहजालांत पाडूं विसर कार्याचा । अग्निकुंड आतां पेटणार, महा भयंकर, दिव्य करणार, स्त्रिया साचार, सत्य ही वाचा ॥ " " हे नाथ ! अग्निदिव्य करून स्वर्गि कां जाऊ । चिता पेटवूनी बहुमोल प्राण का देऊ । हें मरण मला ना रुचे, समशेर घेऊ । चला जाऊ पहाया रण, शत्रूच सैन्य, करून हैराण, होऊं द्या धन्य अपेक्षा साहूं ॥ " " प्यारि । धन्य जाहलों वचन तुझें ऐकून । कासावीस जीव होई विनति करवेना मान्य । रणक्षेत्रीं शरिर वज्र, मन शुद्ध पाषाण । तूं अबला कोमल शरिरान, फुलापरी नाजुक मनान, पाहिल नाहिं रण ॥ " चाल-" हे नाथ रणं किती पाहिली, तरवार चालविली, संधि गोड आलि, हर्ष बहु झाला—देव पावला ॥ " " प्रिये । लढाई फार भीषण, रग्तधार वाहून, चिखल होऊन, प्रेत पायाला—ढीग

पडला ॥ कत्तली तिथं चालती, घायाळ लोक होती, धाय धाय रडती, नित्य दृष्टीला—सोडि हट्टाला ॥ मोंगल बहुत बदमाश, उन्मत्त नीच, वाराचा स्पर्श होता, आंगाला । त्वेष आम्हाला ॥" "नाथ ! जिथ पती, तिथच सती, ग्रंथ सांगती, पतिव्रता ती, बोल कुणाला । रणांगणीं चला ॥" "प्यारि ! तुझें बोल ऐकून, झाल समाधान, एकलिंगजीनं, रत्न शोधील,–माकडा दिल ॥ रणांगाणिं यायचा निर्धार, झाला तुझा जर, भेटु मातेला––करू नमनाला ॥" चाल––गड् गडाट् रणभेरीचा सुरूं जाहला । नौबदि झांज झणझणा ध्वनी ऊठला । शिंगवाल्यांनीं कल्लोळ करून सोडिला । खण्खणाट समशेरींचा होऊं लागला । हें ऐकून बालपत्नीनं पोषाख केला । बांधला पिवळा जरतरी पटका डोईला । सुरवार चढविलि पायाला, लाविला तुरा डोईला, जाळिदार चिलखत आंगाला, आंगरखा वरि घातला, समशेर कमरेला लावली, पतीपाशिं आली सिद्ध युद्धाला । देशभक्तिचा सागर उल्लंघायाला । धन्य धन्य तरुण दांपत्य पार न कीर्तीला । झाल तय्यार द्याया जीवाला, घ्याया मोक्षाला । महा धीर वीर तो पुत्त पत्निसह आला । माताजींच्या शिबिरामधी तवा शिरला ॥ ८ राम वनवास झाला पुन्हा कली युगांत । रामसिता शोभली जोडि नाहिं उण त्यांत । ही सिता शौर्यानं बिजाळि परी चमकत । कौसल्येच्या भेटिस चालल, अश्रु नाहिं आल, मन ना चळल, धन्य दांपत्य ॥ ४ ॥ धृ० ॥

५

बंधु हो ध्यान धरा पहा पुत्ताची माता । वीराची माय ती करि देशाची चिंता । "तारिल कोण या चितुरगडासी आतां । गेला कलिजा माझा आधार, सुटला धीर, पडे तरवार, काय करु आतां ॥" असा विचार मनीं ये पाहि डोळे उघडून । पाहिली रामसिता धरित मातेचें चरण । बालपुत्ता ! धन्य तूं, बालपत्नि तव धन्य । मातृहृदय तवा खळबळे, वीरश्री उसळे, शत्रु ये वेळे,

करिन गतप्राण ॥ स्वातंत्र्यभक्तीची ज्योत तवा उजळली । तारका विपुल तेजाची नभीं चमकली । रोमरोमीं वीरश्री तया क्षणीं संचरली । आलि असुर-मर्दिनी देवी, तेजा न रवी, तमा लोपवी, सती अवतरली ॥ कमरेला नंगि तरवार पाठिला ढाल । पुत्रासवें चालली वीरश्री तेजाळ । हिंदु धर्मवीरापुढें काय करिल कलिकाल । धर्मासाठीं सदा तय्यार, स्वधर्मवीर सेवा करणार, येई कधिं काळ ॥ चाल–रणभेरि वाजुं लागली, गर्दि उसळली, हाकाटी झाली, महालाभवति पुत्त पूढती ॥ आलि त्याचि माता आणि पत्नि, पाहिल सेनेनीं नीट न्याहाळूनी, हिय्या एक केला–पळवु तुर्काला ॥ वीररमणि आल्या नीघुन, कुंड टाकून, झाल्या बेभान, जोहार राहिला–प्रळयकाळ आला ॥ चा– लागली आग गडाला तशी नगराला । काडिचा मिळेना आधार शत्रुसैन्याला । काळ्याकुट्ट धुराचा लोट गगनिं चालला । गेलं रजपूतांच वैभव अन् राजमुकुट भंगला । अग्निनारायणाचा अमल सुरूं जाहला । राजस्थानचा इतिहास भाग इथच संपला ॥ ऽइकड गडावरिल वीर जोरानं लढती । पण नगरांत लोकांनीं अग्नित दिल्या आहुती । नाहीं मान वाकविणार शत्रु पुढ कल्पांती । यापेक्षा जळूनी जाऊं, मोक्षपद घेऊ वीरवर वृत्ती ॥ धृ० ॥

६

धर्मरक्षण किंवा मरण आपुल्या हातानं । जय घडो किंवा तुटो रणीं आपुली मान । धन दौलत नको राजवैभव पापाची खाण । नाहिं लढल वैभवासाठीं, दौलतीसाठीं, परि लढला स्वदेशासाठीं, धर्माच्या साठीं, वीर ते धन्य ॥ साध्वी स्त्रिया, आया बहिणी आणि लेकि सूना । उज्वल ब्रीदाकरितां रणीं अर्पिती प्राणा । चारि खंडांत ऐसा इतिहास दिसेना कवणा । भारतभू पवित्र भली, शूरा प्रसवली, कृतार्थ झाली, करी वंदना ॥ अकबरसेनेवरि ओढवला कल्पांत । धूळधाण झालि पुरि रजपुत सैन्य रेटीत । रजपूत सिंह

पडला ॥ कत्तली तिथं चालती, घायाळ लोक होती, धाय धाय रडती, नित्य दृष्टीला—सोडि हट्टाला ॥ मोंगल बहुत बदमाश, उन्मत्त नीच, वाराचा स्पर्श होता, आंगाला । त्वेष आम्हाला ॥" "नाथ ! जिथ पती, तिथच सती, ग्रंथ सांगती, पतिव्रता ती, बोल कुणाला । रणांगणीं चला ॥" "प्यारि ! तुझें बोल ऐकून, झाल समाधान, एकलिंगजीनं, रत्न शोधील,–माकडा दिल ॥ रणांगणिं यायचा निर्धार, झाला तुझा जर, भेटु मातेला–– करू नमनाला ॥" चाल––गड् गडाट् रणभेरीचा सुरूं जाहला । नौबदि झांज झणझणा ध्वनी ऊठला । शिंगवाल्यांनी कल्लोळ करून सोडिला । खण्खणाट समशेरींचा होऊं लागला । हें ऐकून बालपत्नीनं पोषाख केला । बांधला पिवळा जरतरी पटका डोईला । सुरवार चढविलि पायाला, लाविला तुरा डोईला, जाळिदार चिलखत आंगाला, आंगरखा वरि घातला, समशेर कमरेला लावली, पतीपाशिं आली सिद्ध युद्धाला । देशभक्तिचा सागर उल्लंघायाला । धन्य धन्य तरुण दांपत्य पार न कीर्तीला । झाल तय्यार द्याया जीवाला, ध्याया मोक्षाला । महा धीर वीर तो पुत्त पत्निसह आला । मातार्जीच्या शिबिरामधी तवा शिरला ॥ ८ राम वनवास झाला पुन्हा कली युगांत । रामसिता शोभली जोडि नाहिं उण त्यांत । ही सिता शौर्यानं बिजलि परी चमकत । कौसल्येच्या भेटिस चालल, अश्रु नाहिं आल, मन ना चळल, धन्य दांपत्य ॥ ४ ॥ धृ० ॥

५

बंधु हो ध्यान धरा पहा पुत्ताची माता । वीराची माय ती करि देशाची चिंता । "तारिल कोण या चितुरगडासी आतां । गेला कलिजा माझा आधार, सूटला धीर, पडे तरवार, काय करु आतां ॥" असा विचार मनीं ये पाहि डोळे उघडून । पाहिली रामसिता धरित मातेचें चरण । बालपुत्ता ! धन्य तूं, बालपत्नि तव धन्य । मातृह्रदय तवा खळबळे, वीरश्री उसळे, शत्रु ये वेळे,

करिन गतप्राण ॥ स्वातंत्र्यभक्तीची ज्योत तवा उजळली । तारका विपुल तेजाची नभीं चमकली । रोमरोमीं वीरश्री तया क्षणीं संचरली । आलि असुर-मर्दिनी देवी, तेजा न रवी, तमा लोपवी, सती अवतरली ॥ कमरेला नंगि तरवार पाठिला ढाल । पुत्रासवें चालली वीरश्री तेजाळ । हिंदु धर्मवीरापुढें काय करिल कलिकाल । धर्मासाठीं सदा तय्यार, स्वधर्मवीर सेवा करणार, येई कधिं काळ ॥ चाल–रणभेरि वाजुं लागली, गर्दि उसळली, हाकाटी झाली, महालाभवति पुत्त पूढती ॥ आलि त्याचि माता आणि पत्नि, पाहिल सेनेनीं नीट न्याहाळूनी, हिय्या एक केला–पळवु तुर्काला ॥ वीररमणि आल्या नीघुन, कुंड टाकून, झाल्या बेभान, जोहार राहिला–प्रळयकाळ आला ॥ चा–लागली आग गडाला तशी नगराला । काडिचा मिळेना आधार शत्रुसैन्याला । काळ्याकुट्ट धुराचा लोट गगनिं चालला । गेलं रजपूतांच वैभव अन् राजमुकुट भंगला । अग्निनारायणाचा अमल सुरूं जाहला । राजस्थानचा इतिहास भाग इथच संपला ॥ ऽइकड गडावरिल वीर जोरानं लढती । पण नगरांत लोकांनीं अग्नित दिल्या आहुती । नाहीं मान वाकविणार शत्रु पुढ कल्पांती । यापेक्षा जळूनी जाऊं, मोक्षपद घेऊ वीरवर वृत्ती ॥ धृ० ॥

६

धर्मरक्षण किंवा मरण आपुल्या हातानं । जय घडो किंवा तुटो रणीं आपुली मान । धन दौलत नको राजवैभव पापाची खाण । नाहिं लढल वैभवासाठीं, दौलतीसाठीं, परि लढला स्वदेशासाठीं, धर्माच्या साठीं, वीर ते धन्य ॥ साध्वी स्त्रिया, आया बहिणी आणि लेकि सूना । उज्वल ब्रीदाकरितां रणीं अर्पिती प्राणा । चारि खंडांत ऐसा इतिहास दिसेना कवणा । भारतभू पवित्र भली, शूरा प्रसवली, कृतार्थ झाली, करी वंदना ॥ अकबरसेनेवरि ओढवला कल्पांत । धूळधाण झालि पुरि रजपुत सैन्य रेटीत । रजपूत सिंह

पराक्रमी लांडगेतोड करित । रग्ताचा झाला चिखल, रडति घायाळ, ढीग पडल, पाहवति ना प्रेत ॥ अकबराचि त्रेधा उडालि प्रसंग दारुण । पुत्त आणि त्याची माता पत्नी लढति निकरान । वीर पुत्त आणि त्याची पत्नी वय लहान । शत्रूची कत्तल केली, तरवार चालविली, म्यान नाहिं केली, जाई जरि प्राण ॥ चाल–खांद्यास खांदा भिडवून, पतीपत्नीन कराया रण, तरवार उपशिली–गोष्ट कुठ झाली ॥ लढाईचं ऐकतां नांव, फक्त आम्हि भ्याव, हातपाय गाळाव, तरवार ती गेली–पुन्हा नाहिं आली ॥ परधर्मी आयाबहिणी, भ्रष्टविति कोणी, कांहीं नाहिं मनीं, हिंदु दुर्बल–भुखामधि बल ॥ रग्ताच्या धारा निथळत, लढे वीर पुत्त, दुपार होत, रेटित शत्रूला, शत्रू ठार केला ॥ "नाथ !" अशी जाहली वाणी, अस्पष्ट ध्वनी केला हा कोणी, पाहि पत्नीला जीव परि गेला ॥ "प्यारि !" म्हणुन हाक मारिली, हृदयिं धरली, दृष्टि भिडविली, श्वास टाकिला–वीर नीमाला ॥ चाल–लोपला हिरा वीर पुत्त पत्नि हिरकणी । अर्भके देशाची पडली समरांगणीं । देशभक्ति, स्वाभिमान, शौर्य गेल लोपूनी । विलास व्यापी स्त्रियांना रोमरोमांतुनी । रंगी ढंगी झाल चैनी पुरुष, करिति फॅशनी । फॅशनी कसल्या फासणी, फसाल या क्षणी ॥ ऽमम बंधु वीर शूर पुत्तापरि जव होती । आणि आयाबहिणि वीरपत्नीपरी आचरती । तो दिवस सोन्याचा शाहिरास येई स्फूर्ति । कडकडेल डफावरि थाप, पारतंत्र्यपाप, जळाल खाक, होंईल ही कीर्ती ॥ धृ० ॥

---

## नारायणरावाचा खून

### शाहीरः—लहरीमुकुंद

दःख्खनचा दिवा मालवला हिरा हरपला । काय गुपीत घाला केला नारायणरावाला । कशी करुणा नव्हती आली राघोबाला-हो-अपघात करून मारिले सख्या पुतण्याला ॥ धृ० ॥

१

एकछत्र करुनि गेले राव माधवराव । थरथरा कापत होते अष्ट उमराव । वसविल हस्तिनापूर राज्य पाच्छाव । दादासि मोकळ केल राज्य कराव । तुटली आयुष्याची दोरी नाहीं उपाव । त्यानें मरते समयिं बोलाविल नारायणराव । उपदेश केला भरली नेत्रिं आसव । चाल—दादासि मिळुन असाव, रयतेला दुःख नाहिं द्याव, प्रीतीनं राज्य कराव, ऽमाझ्या मोक्षपदाचं वचन सांभाळाव । आनंदिबाईला जवळ बोलाविल । बया आम्ही जातो मोक्षपदाला । तुम्हासी कळविल । ओटींत नारायणराव तुमच्या हो घातला । मग माधवराव मोक्षपदासी गेला । पण करुणा नव्हती आली भगवाना तुला ॥ धृ० ॥ १ ॥

२

श्रीमंति राज्यामंधी पुण्याची महिमा कशि होती । जागजागी अनुष्ठान ब्राह्मण भोजन होती । तुपपोळी खायासि नव्हति ब्राह्मणास निवती । चोहोकडे राज्यामधि वेदघोष चालती । स्वारि श्रीमंताची नित्य पर्वतिला जाती । सोन्याचा गणपती पुजा श्रीमंताची । काय आरसे महाल मजा दिसे वाड्याची । कारंजे वाडा सदर नाना भाऊची । बुधवारचा वाडा मसलत पंचायतिची । चाल—काय बैठक रावसाहेबाची, पानविडे मजा खायाची, लोक येताति हो मुजऱ्यासी, गुणी चतुरजन दाविति चातुर्यासी, गुण पाहून देति तनख्याशी । ऽनळाला काम लाविल हुकुम हो झाला, पुढे कोट बांधणार होते हो शहर पुण्याला ॥धृ०॥२॥

३

भाद्रपद तेरशी दिवस सोमवार ते दिवशीं–दिवस चढला दोन प्रहर । सुमेरशिंग गारदी होऊनि तय्यार । त्या आनंदीबाईनं बोलाविला कचेरीवर । आनंदिबाई बोले हो सुमेरशिंगाला । तुला भाऊ म्हणून माझा रे मी मानला । जर खरें सांगशिल मला आनंदिबाईला । हे पुणं शहर अर्धं देईन तुला । बेलभंडार तुलशीपत्र इमान तुला मला । मग सुमेरशिंग गारदी बोले बाईला

राज्यपद दिल कोणाला सांग आम्हाला । राज्यपद दिल आई दादानीं नारायणरावाला । चाल— आंग टाकिति हो धरणीला, तोडिती कुरळ्या केसाला, राज्याचा नाश माझ्या केला, शिव्या देती राघोबादादाला, माझा हुकूम जाऊनी सांग माझ्या नवऱ्याला । नारायण धरूनी आण माझे कचेरिला नाहिंतर कुंकु पूशिते आता मी पदराला ॥ धृ० ॥ ३ ॥

४

सुमेरशिंग गारदी होउनि तयार । मला हजेरी दे आनंदिबाई म्हणून लावि कट्यार । मग शिरला आरसेमहालांत उपसुनि तरवार । एक हजार गारदि शिपाई नित्य बरोबर । हाति नागव्या तरवारि हातामधि भाले-त्यानि आरसेमहाल वेढिला हो चौफेर । केसरी भात जेवल होत नारायण । त्या राजवाड्यामधि झाले निद्राशयन । चाल—झाली गर्दी एकच हल्ला, पर्वति आई गेली स्वप्नाला, ऊठ नारायणा तुझा घात झाला, राव स्वप्नी जागा झाला, उठूनि उभा राहिला, थरथरा कापो लागला, पाणी आले त्याचें नेत्राला, नउ महिने नाहिं भोगिल पुरत राज्याला, डोळाभर नाहिं पाहिल पुरत अस्तुरिला, आनंदिबाईन आताच घात मांडला, आईबाप जवळ नाहींत सोडवायाला, नाना फडणीस नाहींत पुण्याचे सदरेळा, नारायण पळो लागला, आसरा नाहीं लपायाला, गाय होती देवपुजेला, मिठी गाईच्या गळ्याला, गोमाता म्हणती तुला, प्राण वाचिव आतां आपला, गाय हंबरती खाटयाला, पाणी गाईच्या नेत्राला, सुमेरशिंग उभा राहिला तोडायाला, गाईला वार लागला, आसरा गाईचा सोडीला, नारायण पळो लागला, हिंडोनि सारा वाडा भयाभित झाला, थरथराच कापत राघोबादादापाशि आला ॥ धृ० ॥ ४ ॥

५

अन्नपाणि गोड लागेना चैन पडेना आनंदिबाईला । बारावर एक वाजला घंटा झाला । कां अजुन सुमेरशिंग येईना सांगायाला । मग सुमेरशिंग गारदी

जवळ बोलाविला । काय हुकुम दिला दादांनीं सांग आम्हाला । मग सुमेर-शिंग गारदी बोले बाईला । दादासाहेब हुकुम देईनात नारायण धरायला । किती शिकवूं या मेल्याला बाई शिपुर्ड्याला । चाल—तीन रुपड्याच्या चाकराला, काय पुढल होणार ठाऊक नाहिं याला, राज्यपद दिले रे म्हणे नारायणरावाला, ऽसापाच्या पाठीवर मेल्या तूं पाय दिला, पुढें घात तुझ्या जिवाला, तुझी लेकरेबाळे सम्दी विकील ढाणकाला, होयाचें होउदे जिवें मार दोघाला ॥ धृ० ॥५॥

५६३८

६

मग सुमेरशिंग गारदी बोले दादाशी । यामुळें आपुला प्राण तुम्हि का टाकितां । कशि आमचीं मनुष्यें पाण्यामधी गाळवितां दादानिं । हात काढिला मग झाला परतां । तुळाराम परदेशी नारायणाला झाला ओढितां । वैऱ्यानें टाकिला हात खांद्यावरता । चाल—झाली मुक्ती एकच घाई, रक्त-वस्त्र भिजली बाही, रक्ताचं पूर किति वाही, एक शकल झाल दूठायीं, कढीभात पडला ठायिठायिं, मधें जानव्याचे हाल झाले कांहीं, अखेरी सांगतो तुम्हाला, नारायणरावाच तुकड तुकड झाल कारण काय याला, जखमा चढल्या विश्वराम ढेरे चोपदाराला, आणि कैकाला गाईचा वध तिथ झाला, भाऊबंदकी नारायणरावाला, भाऊबंदकि पेशवे वंशाला, घरांतील दुही कारण राज्यनाशाला, देशांतील दुही कारण राज्यनाशाला, स्वातंत्र्याचा होम जाहला, पारतंत्र्य आलं उदयाला, आपसांत यादवी करून सौख्य कवणाला, गृहकलह, दुहीच बीज न्याव लयाला, साती सामिंद्रांतिल राज्यलक्ष्मी येई भारताला, पेशवाईत लहरी मुकुंदान पवाडा केला, आज अनंतराव शाहीर गाई कवनाला, अवधान दिल श्रोत्याहो धन्य जाहला ॥ धृ० ॥ ६ ॥

# खर्ड्याची लढाई

श्रीमंत धनी महाराज माधवराव । गोकुळीं उभारल्या गुढ्या जन्मला देव ॥ ( झाला म्हणति कृष्ण अवतार, करिति जयजयकार, वीर जणूं भीमार्जुन पांडव ) ॥ धृ० ॥

१

राजाधिराज महाराज, गरिब नवाज धनी श्रीमंत । भासती सदैव देव आमुचे हेचि भगवंत ॥ पाषाण धातुच्या मूर्ति, धरित्री वरती जागोजाग किती, आहेत अनंत । त्या पूज्य परंतू, प्रकट नाहिं जीवंत ॥ तसें नव्हेत हे तर देव कलीमध्यें— भूदेव ब्राह्मण संत । त्या वंशीं पेशवे झाले सबळ बळवंत ॥ त्यांचे वंशीं सवाई माधवराव, जन्मले देव, कृष्ण अवतार, तसेंच केलें नांव । प्रजेला झाला आनंद, करिति जयजयकार, त्यांच यश गाव ॥ धृ० ॥ १ ॥

( कवि प्रभाकरकृत पेशवे वंशाच्या पोवाड्यांतील भाग )

२

तो पांडवांचा अर्जुन यशेश्वरी । ती पहिली निघाली स्वारी मोंगलावरी । त्यांनीं डेरे दिले ( समद्यांनीं ) गारपिरावरी । तो मोगलाचा वकिल विनंत्या करी । ते दवलतराव शिंदे अघाडी बिनीवरी । त्या होळकराची फौज धासत भारी । त्या बाबा फडक्याची कोरबंदी न्यारी । त्या जरिपटक्याखालीं हुजुरात चाले सारी । ( चाल–धावती ) रावमाने मानकर घाटगे पाटणकर, यादव निंबाळकर, ( चाल–एकछत्र ) ..........ते धारुरकर भोसले कीं सुपेकर स्वारी बरोबर । मोहिते न् शिरके येऊन मिळाले रणाचे वर । ते गणेशपंत ढमढेरे आले बहाद्दर की सवतेदूर ते मानाजी फाकडे भले रणशूर मारी तलवार ॥ ( चाल–धावती ) चालतांना स्वारि शोभती, कोरबंदी

जपुन चालती, अशा सरदाराच्या गती, कालुकर्णे वाजे हाती। आपुलाल विनीवर हत्ती । पुढें सांडणीस्वार धावती ( एकमेका इशारत करिती, शिस्तीनें चाला हो म्हणती, हर महादेव गर्जती, मोगलावर तुटूनशानि पडती ) ( चाल–एकछत्र ) घोडदळ पायदळ कुठंवर पहाव ॥ धृ० ॥ २ ॥

३

तो पहिला शहाणा नाना नांव साज । त्यानें श्रीमंताचें भलें राखिलें राज्य । अशी पुण्य पवित्र खलबतें होती रोज । ते पंत प्रतिनिधी [ जसें ] सूर्याचें तेज । ते अपाजी बळवंतराव भुजेशी भुज । ते भवानराव घाटगे नांव साज । नांव त्या पानशावर रावसाहेबाची रीझ । त्या राज्याचा हमेश डंका वाज ॥ ( चाल— पूर्णचंद्र ) अशी गडबड झाली फार । शिलेदारा घोडे मिळेना ॥ दोशांचे घोडे चौशांला । अशा खाशाला कोणी देईना ॥ विसाचं तट्टु साठाला । अशा दाटीला कुठें मिळेना ॥ ( चाल–मोठी ) भिवरेवर पडला तळ, रयत तळमळे, नजर थांबेना । दाण्याचें झालें हांतरुण, खुशाल पाहून कोणी घेईना ॥ बायकांचें काढलें मोतीं, घेतलें हातीं, गुजर ठेवीना । टक्याच रुकें पायलीला, दळणवालीला दळन देईना ॥ [ चाल– धावती ] तीन लक्ष मिळाल दळ । आपुलाले धरती बल । लष्करांत पडली भूल, मोठे मोठे कीं लढनेवाले नारोशंकर, विठ्ठल शिवदेव ॥ धृ ॥ ३ ॥

४

गेले कागद नागपुरा कीं भोसल्याला । दरकुच येऊन सिनेवरती मिळाला । तो जिवबा दादा बक्षी अलबेला—ते वेळे काय बोलला रावसाहेबाला । तो कसला कसा आहे मोगल पाहूं द्या मजला । तो डी बाय फिरंगी गोळा मारनेवाला । फौजेंत केली ताकीद सडे स्वारीला । त्या गणेशपंत बेहऱ्याला बाबा फडक्याला । त्या परशुराम भाऊला जिवबादादाला । तुम्ही मिळुन शेनी जावे झुंजायाला । ( चाल– मोठी ) मोंगलानें गलिम पाहिला, घोडा

उठविला कीं त्या रंगणांत । भले भले माईचे पूत, सुरई हातांत मारिती हात ॥ तो रावरंभा सरदार बसून हौद्यांत तिरंदाजींत । ते मश्रुल् मुलुख इत्तीच्या हौद्यांत बसून हणा हणा म्हणवीत ॥ ( चाल—धावती ) बहु कोस मागें सारिला, मार पडली हुजरातिला, त्या परशुराम भाऊला बाबा फडक्याला, जखमा चढल्या मरदांला, अशा कैक—सरदाराला रणखांब रोविला मुकाम घोडेगांव गांवाला ॥ धृ० ॥ ४ ॥

५

आला मोंगल देशावरी कळल्या खबरी । गांवन गांव ओस पडली सारी । ही पुण्यप्रतापी रावसाहेबाची स्वारी । त्या शाहुराजाचा हात पुरता शिरी । त्या बुधवारच्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं । त्या जिवबादादानें तोफा लाविल्या दोहिरी । त्या भोसल्याच्या बाणाच्या ( मोठ्या ) भरारी । त्या हनुमंतानें लंका जाळिली सारी । तेवि सवाई माधवराव यशस्वरी । हणा हणा म्हणून निशाणें उठलीं सारी । [ चाल–मोठी ] मोंगलानें गर्दीम पाहिला, पळ काढिला, ( पीर कोपला अशा समयाला । शत्रूंत धीर ना राहिला, झाला गलबूला ) करिति अल्ला अल्ला ॥ मर्दानीं [ कावा साधिला, घाला घातला, लुटी फार केल्या ] रात्रीं समयाला । खर्ड्यास नेऊन घातला नबाब साहेबाला ॥ पाण्याचा झाला कहर, ( झाला हाहाकार ) दाणा शेरभर आला कवलाला । [ ते वख्ती नबाब शरण येऊन बोले रावाला ] ( चाल—धावती ) राव देतो मी खंडणी, घ्या मुलूख तुम्ही लिहूनी, मशिरुल्ला देतो धनी, तेव्हां परशुराम भाऊंनी, रावसाहेब, नाना फडणीसांनीं । मनसुबी केली बैसुनी । दिली निशाणें सोडुनी, आले पुण्याशी निघुनी । यश घेतले पांडवांनीं । बहुरंग्याची लावणी । पोवाडा केला मर्दांनी । त्या गुरुरायाच वदन नित्य पहाव ॥ धृ० ॥ ५ ॥

---

* दोन्ही पोवाडे फार जुने असून ते केळकरकृत ऐतिहासिक पोवाड्यांतून घेतले आहेत.

# ती भवानी तलवार कुठें ?

## अनुवादक—बालानंद

अंगाला लागली झळा–लोपली म्हणुनि चंचला । जड पारतंत्र्य श्रृंखला–
तोडिली कुठं चंचला ॥ धृ० ॥
लाडकिगे ! तूं शिवरायाची, पतिव्रता पावित्र्यराशी, स्वामीसह सती कीं जाशी
–अरि पळति पाहुनी जिला, धाक हो सकला–ती कुठं असे चंचला ॥ १ ॥
वीरश्री प्रकटशी मूर्त, पराक्रम केलं अमीत, भागलीस होशी मूर्च्छित—
नच नाथ पडे दृष्टिला, असह्य कळा, किती शोक नाहीं त्या तुला ॥ २ ॥
रायगडीं समाधीमाजीं, विहरशी वाटते आजी, परवशता झाली गाजी,—
बहु विषाद तुज वाटला, अश्रुही गळला–पारखी भरतभूमिला ॥ ३ ॥
चपलेपरि नभिं चमकशी, कृष्णघनामाजीं दडशी, उडि जलधीमाजीं घेशी–
नवरत्न सहवासाला, हर्ष जाहला–विस्मृती आमची तुला ॥ ४ ॥
नागिण तूं बहु तेजाळ, स्वातंत्र्यमणी घे काळ, अंतरीं झालि खळबळ,—
यश मलिन डाग लागला, ना रुचे तुला, पाताळिं वास जाहला ॥ ५ ॥
मानधन मोठे गणुन, अपमान दूरि सारून, सुविवेक मनीं करून,—
उड्डाण नभोमंडळा, घेइ ती चपला,–निमिषांत लोप जाहला ॥ ६ ॥
तल्वार भवानी इमानी, अजि बंधुबंधुवरि उठुनी, विश्वासघातकी बनुनी,—
आळसाचा गंज चढविला, आम्हि तुजला,–स्वकरें कलि घरीं आणिला ॥७॥
देशभक्ति म्यान मोडील, तव तेज हतप्रभ केलं, तूं कुठें वसशि ? कवि बोल,–
जव नाहिं स्वार्थ सुटला, नये भूमिला–विरश्री तूं चंचला ॥ ८ ॥
देशकार्यीं वाहती प्राण, भेदाभेद सर्व सांडून, स्वातंत्र्य उषा ये हसून,—
तव चढेल पाणी तिला, येईल भूमिला–तोडण्या दास्यश्रृंखला ॥ ९ ॥

---

* कवि टेंभुर्णीकर यांच्या काव्यावरून

# एकच हिंदुस्तान

## ( य. खं. कुळकर्णीकृत )

जर कां देश जगावरि असला—
तर तो एकच हिंदुस्तान ॥ धृ० ॥
अधिष्ठान भूवरि तरि करितो विसंवाद आकाशीं ।
स्वर्गीय सुधा प्रथम झेलितो गौरीशंकर जेथें ॥ १ ॥
सृष्टिसुंदरी वैभवशिखरीं सदैव बसुनी हासे ।
काश्मीरांतिल भूप्रदेश जगिं एकच विलसे जेथें ॥ २ ॥
भिन्न भिन्न संस्कृती प्रकृतिही भिन्न जयांची ऐशा ।
नान्यत्र कुठें इतुक्या जाती, एकत्रित त्या जेथें ॥ ३ ॥
शब्दाखातर राज्यहि दिधलें, गुलाम अंगें झाला ।
कर्तव्यास्तव पत्निवधोत्सुक हरिश्चंद्रही जेथें ॥ ४ ॥
ताताज्ञेस्तव राज्य त्यागी, एकस्त्रीव्रत ऐसा ।
कर्तव्याची मूर्तिच केवळ रामचंद्र तो जेथें ॥ ५ ॥
लीलापटु मुत्सद्दी, प्रेमी, अखंड पौरुष पुतळा ।
गीतेचा संदेश जगावरि धुमवी मंजुळ जेथें ॥ ६ ॥
धर्मासाठीं राज्य मिळविण्या आप्तहि वधिले ज्यानें ।
अल्मगीर परि स्वार्जित वित्तें दफन जाहला जेथें ॥ ७ ॥
पतिपत्नींच्या अभिन्न जीवनिं शिंगरवें क्षणमात्रें ।
कंठपाश तो कंठस्नानें, तोडी " जोहार " जिथें ॥ ८ ॥
जित शत्रूची लूट म्हणूनी शिवबा सन्निध नेली ।
ती कल्याणी सुतभावानें पुजुनी परतवि जेथें ॥ ९ ॥
प्रभुकार्यास्तव लग्नमंडपीं भीषण शिंग पुकारी ।
विजयपताका रक्तें भिजवुनि, सिंह गडावर गेला जेथें ॥ १० ॥

घोड्यावरती अढळ मांड ती दुरडा हातावरती ।
झोपेस्तव शिर भाल्यावरती, झेंडा अटकेवरती ॥ ११ ॥
विधवा बाला जिवंत बाळी रूढी व्याली तिजला ।
वेसण घाली, धर्म जागवी, राममोहनहि जेथें ॥ १३ ॥
अद्वितीय वच राजकारणी सप्रमाण लढणारे ।
म्हणुनि दरारा मंत्रिगणावर “ गोपाल ” “ बाल ” जेथें ॥ १४ ॥
निःशस्त्र प्रतिकार, अहिंसा, असहकारिता खादी ।
या शस्त्रांनीं झगडे ऐसा वीर महात्मा जेथें ॥ १५ ॥
इतिहासाचीं पानें भिजलीं थबथबलीं रक्तानें ।
“ दुही अपौरुष, धुवा तयांतच ” सांगे कंठरवानें ॥ १६ ॥
सर्व शिकंदर अल्‌मगीर ते आले तैसे गेले ।
अध्यात्मबळें टिकला आर्यंच पुन्हा चढेलच काळें ॥ १७ ॥ धृ० ॥

## विश्वनाथ बाबाजी बंदरकर ( तासवाले )

### पाटील हाऊस ३५६ I खांडके चाळीच्या जवळ

आमच्या येथें सोन्याचांदीच्या सर्व प्रकारच्या बांगड्यांवर व इतर वस्तूंवर, कौशल्यपूर्ण रीतीनें नव्या डिझाइनचा व नव्या फॅशनचा तास काळजीपूर्वक मारून दिला जाईल. तेव्हां मुंबईतील व बाहेरील लोकांनीं आमच्याकडे येऊन एक वेळ खात्री करावी.

---

## धी लक्ष्मी फोनो कंपनी

### रानडे रोड, दादर, मुं. नं. १४

कोलंबीया, ओडियन्, हिज मास्टर्स व्हॉईस वगैरे सर्व प्रकारच्या रेकॉर्डस विकत मिळतील. त्याचप्रमाणें ग्रामोफोन मशिन्स काळजीपूर्वक माफक दरांत दुरुस्त करून देऊं.

आमच्या होममेड मधुर आवाजाच्या मशिन्स विकत घेऊन जिवाची करमणूक करून घ्या !

---

## गृह वस्तु भांडार

### पालन सोजपाल बिल्डिंग, ॲन्टोनीया हायस्कूलजवळ

### दादर, मुं. नं. १४

आमचे येथें सर्व प्रकारचें धान्य, किराणा, लोणी, तूप, चहा आणि सर्व प्रकारचें स्टेशनरी सामान, निरनिराळे साबण व इतर गृहोपयोगी वस्तू अत्यंत स्वस्त दरानें मिळतील.

**एकच वेळ अनुभव घेतल्यास आपणांस खात्रीनें फायदेशीर होईल. तर एक वेळ अनुभव घेऊन खात्री करावी.**

## येत्या दसऱ्याचे दिवशीं ! !

‘ गरीब मजूर ’ या सुप्रसिद्ध नाटकाचे कर्ते

## श्री. विनायक रंगनाथ कुळकर्णीकृत

# “ माझी प्रतिभा ”

व इतर वीस ललित कथांचा सर्वांगसुंदर असा संग्रहणीय संग्रह

प्रसिद्ध होईल !

सर्वांगसुंदर तीनरंगी कव्हर ! सर्वोत्कृष्ट बांधणी ! !

पृष्ठें १९० किंमत फक्त १ रुपया

---




दादरमध्यें हेच ते पहिले--शू मार्टची योजना करणारे,

प्रोप्रायटर

**एन्. एच्. महाजन**

यांच्या

## “धी न्यू दादर शू मार्ट ” मध्येंच

तुम्हांला सुंदर आकाराच्या, मजबूत बांधणीच्या, सर्व तऱ्हेच्या चप्पल्स व शूज, स्लीपर्स, पंपशूज वगैरे मिळतील.

# कोहिनूर स्वदेशी क्लॉथ स्टोअर्स

धामट टेरेसेस बी. बी. सी. आय. स्टेशनसमोर

**दादर, मुं. नं. १४**

आमचे येथें सर्व तऱ्हेचीं उंची पातळें, धोतरजोड्या व कोटींग वगैरे खात्रीलायक माल माफक भावांत मिळेल.

त्याचप्रमाणें आम्ही सर्व प्रकारचे रेडिमेड कपडे मनपसंत शिवून देण्याचें स्वतंत्र खातें उघडलें आहे. तर त्याचा आपण फायदा घ्यावा.

---

# जी. एन्. पानसरे आणि कं.

दादर न्यू मार्केट व बी. बी. सी. आय. स्टेशनशेजारीं

**दादर, मुं. नं. १४**

सुक्या मेव्याचे व हरतऱ्हेच्या फळांचे प्रसिद्ध व्यापारी. आम्ही बाहेर गांवच्या ऑडर्स अर्धी रक्कम आगाऊ मिळाल्यास ताबडतोब खात्रीलायक चांगलीं फळें रवाना करतों तर एकवेळ खात्री करून अनुभव घ्या !

---

# SREE RAJARAJESWARI INSTITUTE

**Sugath Nivas, Opp. Dhuru Hall, Dadar.**

***Shorthand, Typewritig & Correspondence.***

**Scale of Fees :**—Payble iu Advance.

**Group :**—Typewriting Rs. 1/8 ) ...s. 3/- per Month

**Single :**— ...nth

S...

*Admission* ... *r, but is strictly* ...

*Special accommodation for lady stndents.*

T. C. VISWANATHA AIYAR.

SECONDARY TRAINED
*Headmaster.*


REFBK-0005638